# तंत्र शिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य,

3, महापालिका मार्ग, पत्र पेटी क्रमांक 1967, मुंबई 400 001.
दूरध्वनी - 22620601, 22690602, 22641150/51, फॅक्स - 22692102
E-Mail: desk2a@dte.org.in Internet: http://www.dtemaharashtra.gov.in

क्रमांक 2अ/एडीएम/2015/ ८७८
दिनांक : 23 JUN 2015

प्रति,
सहसंचालक,
तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय,
मुंबई/ पुणे/ नाशिक/ औरंगाबाद/ अमरावती/ नागपूर

विषय : शैक्षणिक वर्ष 2015-16 मधील वास्तुशास्त्र पदवी अभ्यासक्रमाच्या प्रवेश प्रक्रियेबाबतची अधिसुचना...

सोबत उपरोक्त विषयांबाबतची अधिसुचना आपल्या माहीती व पुढील कार्यवाहीसाठी जोडण्यात येत आहे, कृपया पहावे.

सदर अधिसुचना आपल्या नियंत्रणाखालील संबंधित संस्थांच्या निदर्शनास आणावी व संकेतस्थळावर प्रसिद्ध करण्यात यावी.

सहसंचालक तंत्रशिक्षण
प्रादेशिक कार्यालय, नागपूर
आवक क्रमांक ... 4686
दिनांक ... 22 JUN 2015

(डॉ. सुभाष महाजन)
संचालक,
तंत्रशिक्षण संचालनालय, म.रा., मुंबई

पृ.पत्र क्र. तंशिसं/विकाना/प्रवेश प्रक्रिया/२०१५/ 1895
दिनांक : 23 JUN 2015

प्रत : प्राचार्य /संचालक,
सर्व वास्तुशास्त्र पदवी अभ्यासक्रम संस्था
नागपूर विभाग, नागपूर यांना माहिती व आवश्यक कार्यवाहीकरीता.

त्यांना कळविण्यांत येते की, सोबत जोडलेल्या संचालनालयाच्या अधिसुचनेप्रमाणे आवश्यक त्या कार्यवाहीकरीता.

सहसंचालक,
तंत्रशिक्षण, विभागीय कार्यालय,
नागपूर

# तंत्र शिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य,

3, महापालिका मार्ग, पत्र पेटी क्रमांक 1967, मुंबई 400 001.
दूरध्वनी - 22620601, 22690602, 22641150/51, फॅक्स - 22692102.
E-mail : desk२a@dte.org.in Internet :http/www.dtemaharashtra.gov.in

(2015-डिजीटाईज्ड कालबध्द सेवा वर्ष)

अधिसूचना

क्रमांक : २अ/एडीएम/२०१५/ ८०३

दिनांक : 11 JUN 2015

पहा : सन २०१५ चा महाराष्ट्र अध्यादेश क्रमांक ७

शासनाने उपरोक्त अध्यादेश दिनांक १२.५.२०१५ रोजी निर्गमित केला असून महाराष्ट्र राज्यातील विनाअनुदानीत , खाजगी व्यावसायिक संस्थांमधील प्रवेशाचे व शुल्काचे विनियमन करण्यासाठी आणि त्याच्याशी संबंधित किंवा तदनुषंगिक बाबींसाठी तरतूद करण्याकरिता अध्यादेशातील प्रकरण २ च्या कलम २(ख) आणि (ग)अन्वये खालील बाब नमूद केल्या आहेत.

(ख) "समुचित प्राधिकरण" याचा अर्थ, जे, व्यावसायिक पाठ्यक्रम किंवा शैक्षणिक विद्याशाखा यांना मान्यता देते व त्यांचे विनियमन करते असे, राज्य वा केंद्र शासनाने घोषित केलेले प्राधिकरण, असा आहे ;

(ग) "केंद्रीभूत प्रवेश प्रक्रिया (कॅप)" याचा अर्थ, शैक्षणिक संस्थांमध्ये विविध व्यावसायिक पाठ्यक्रमांसाठी विद्यार्थ्यांना प्रवेश देण्याकरिता, पारदर्शक रीतीने एक खिडकी पद्धतीद्वारे सक्षम प्राधिकायाने पार पाडलेली केंद्रीभूत प्रवेश प्रक्रिया, असा आहे ;

अध्यादेशातील तरतूदीनुसार व्यावसायिक अभ्यासक्रमांसाठी एकाच यंत्रणेकडून प्रवेश प्रक्रिया राबविण्याचे शासनाचे धोरण विचारात घेता महाराष्ट्र वास्तुकला महाविद्यालय असोसिएशन (MASA) मुंबई यांचेकडून वास्तुशास्त्र पदवी अभ्यासक्रमासाठीची प्रवेश प्रक्रिया राबविता येणार नाही.

वरील तरतूदींचे अवलोकन करून त्यानुसार शैक्षणिक वर्ष २०१५-१६ मधील वास्तुशास्त्र पदवी अभ्यासक्रमाचे प्रवेश संचालनालयामार्फत केंद्रीभूत प्रवेश प्रक्रिया राबवून करण्यात येतील याची सर्व संबंधित संस्थांनी नोंद घ्यावी.

त्याअनुषंगाने सर्व खाजगी विनाअनुदानीत वास्तुशास्त्र पदवी अभ्यासक्रमांच्या संस्थांना सूचित करण्यात येते की, शासनमान्य संस्थास्तरावरील मंजूर प्रवेश क्षमतेच्या २०% कोटयातील जागा वगळता वास्तुशास्त्र पदवी अभ्यासक्रमाचे प्रवेश राज्य शासनाचे सक्षम प्राधिकारी म्हणून संचालनालयाच्या वतीने नाटा परीक्षेमार्फत केंद्रीभूत प्रवेश प्रक्रियेद्वारे करण्यात येणार असून अन्य कोणत्याही माध्यमातून सदर संस्थेतील प्रवेश करता येणार नाहीत.

(डॉ. सुभाष महाजन)
संचालक, तंत्रशिक्षण महाराष्ट्र राज्य, मुंबई

D:\Budage\२०१५-१६\Architecture\notification of admission.docx